**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१५५/२०२२**
सैफुल्लाह वि. नगरपालिका, नांदगाव

**निशाणी क्र.०१**

**CNR No.MHNS170009122022**

अर्ज जन्म—मृत्यु नोंदणी कायदा कलम १३(३) अन्वये जन्माची नोंद करणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील मजकुर थोडक्यात पुढील प्रमाणे, अर्जदाराचा मुलगी मनतषा सैफुल्लाह शेख हीचा जन्म दि. ०३/१०/२००९ रोजी नांदगाव, जि.नाशिक येथे झाला असुन तिच्या जन्माची नोंद जन्ममृत्यु नोंदवहीत होणे आवश्यक होते, परंतु ते राहुन गेलेले आहे. सबब, सदरचा अर्ज.

०२. अर्जावरून सामनेवालेला नोटीस काढण्यात आली असता त्यांनी **नि.क्र.०५** वर म्हणणे सादर केले. त्याचप्रमाणे नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली, परंतु आजतागायत कोणत्याही इसमाने आक्षेप नोंदविलेला नाही. सदरची पेपर नोटीस **नि.क्र.०९** खाली दाखल केली आहे. अर्जदारातर्फे त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.०६** वर दाखल केले आहे. सामनेवालेने दिलेले प्रमाणपत्र **नि.क्र.१०** प्रमाणे आहे. अर्जदाराचे आधारकार्डची प्रत **नि.क्र.११** वर दाखल केले आहे. अर्जदाराचा पुरावा अर्जाप्रमाणे असून नाकारण्यास कोणतेही कारण नाही. अशा परिस्थितीमध्ये अर्जदाराच्या मुलीची जन्म नोंद होणेकरीता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे, करिता खालील आदेश.

**आदेश**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. सामनेवालेने अर्जदार यांचेकडुन आवश्यक शुल्क स्वीकारुन मनतषा सैफुल्लाह शेख हीचा जन्म दि.०३/१०/२००९ रोजी झाल्याबाबतची नोंद त्यांच्या कार्यालयात करावी.

SHARAD GINYANDEV DUBALE
Digitally signed by SHARAD GINYANDEV DUBALE
Date: 2023.03.18 13:53:20 +0530

दिनांक १८/०३/२०२३

( श.गि. दुबाले )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदगाव.